आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय

## कुळगाव बदलापूर

आणि

## IQAC आयोजित

# Career In Computer

## अहवाल

आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय आणि IQAC आयोजित "करिअर इन कॉम्प्युटर" या विषयावर दिनांक 11 जानेवारी 2023 रोजी सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे खजिनदार मा. श्री. तुषारजी आपटे उपस्थित होते. मा. श्री. संदीप भेले सर यांनी पाहुण्यांचे स्वागत आणि प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास आदर्श महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. सौ. संगीता पांडे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भेले सर यांनी केले.

कार्यक्रमाच्या विषयास अनुसरून आपल्या कॉलेजच्या कॉम्प्युटर लॅब चे इन्चार्ज श्री. मिलिंद जोहोरे यांनी करिअरमध्ये कॉम्प्युटरचे महत्व उपस्थित विद्यार्थ्यांना समजावून दिले. याच विषयाच्या अनुषंगाने आपल्या कॉलेजमध्ये सुरू करण्यात येत असलेल्या तीन नवीन कॉम्प्युटर कोर्सेसची माहिती श्री. जोहोरे यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. यामध्ये Tally ERP 9 - Basic Course, Tally ERP 9 - Advanced Course आणि MS Excel VBA Programming Course यांचा समावेश आहे.

यापैकी MS Excel VBA Programming Course च्या सविस्तर माहितीसाठी श्री. जोहोरे यांनी एक Power Point Presentation Show सादर केला.

यानंतर यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी Basic Computer Course केला आहे त्यांच्या Assignments Power Point Presentation द्वारे सादर करण्यात आल्या.

यानंतर जे विद्यार्थी Basic Computer Course (Batch - 1) यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले अशा विद्यार्थ्यांना मा. श्री. तुषारजी आपटे आणि मा. प्राचार्या सौ. संगीता पांडे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

प्रमाणपत्र वितरणानंतर मा. श्री. तुषारजी आपटे यांचे प्रमुख पाहुणे म्हणून भाषण झाले. आपल्या भाषणात त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना सर्व प्रकाराने आर्थिक सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कोर्सेस चा लाभ घ्यावा आणि सर्व विद्यार्थ्यांनी कॉम्प्युटर विषयात भरपूर प्रगती करावी असे सांगितले.

यानंतर आपल्या कॉलेजच्या प्राचार्या मा. सौ. संगीता पांडे यांचे भाषण झाले. कॉम्प्युटर कोर्स करताना मुले आणि मुली यांचे समप्रमाण असायला हवे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने कॉम्प्युटर विषयात तज्ञ असणे ही काळाची गरज आहे हे पटवून दिले.

यानंतर श्री संदीप भेले सरांनी सर्वांचे आभार मानले आणि कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

श्री. मिलिंद जोहोरे
इन्चार्ज - कॉम्प्युटर लॅब